डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
**अखिल भारतीय समन्वित सिंचन जलव्यवस्थापन योजना,**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र,** वाकवली
Email : dapoli.csiwm@gmail.com

भाकृअनुप
ICAR

जा.क्र.मसंके/जव्ययो/6751 /२०२३ दिनांक: 27 JAN 2023

प्रति,

**व्यवस्थापक,**
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली.

**विषय : कंत्राटी कृषि सहाय्यक नेमण्याची जाहिरात** विद्यापीठाच्या संकेत **स्थळावर प्रसिध्द करणेबाबत....**

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून कळविण्यात येते की, अ. भा. स. सिंचन जलव्यवस्थापन योजना,मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली या योजनेअंतर्गत **कंत्राटी कृषि सहाय्यक** नेमण्याबाबतची जाहिरात विद्यापीठाच्या संकेत स्थळावर त्वरीत प्रसिध्द करण्यात यावी, हि विनंती.

धन्यवाद.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासु,

**प्रमुख शास्त्रज्ञ**
अ. भा. स. सिंचन जलव्यवस्थापन योजना,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
**अखिल भारतीय समन्वित सिंचन जलव्यवस्थापन योजना,**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली**
Email : dapoli.csiwm@gmail.com

भाकृअनुप
ICAR

जा.क्र.मसंके/जव्ययो/674/ /२०२३ दिनांक: / /२०२३

## जाहिरात

अखिल भारतीय समन्वित सिचंन जलव्यवस्थापन योजना, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत रूखी प्रक्षेत्र येथे १८ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली असुन योजनेअंतर्गत ७ संशोधन प्रयोग चालु आहेत. कृषि पिके व मत्स्य बिजोत्पादन अंतर्गत काजु बिजोत्पादन या परिभ्रमण निधीचे काम चालु असुन सन २०२० पासुन रोपवाटिका परिभ्रमण निधी अंतर्गत प्रक्षेत्रावर कलमे निर्मिती कार्यक्रम राबविला जातो. तसेच योजनेअंतर्गत TSP आणि SC-SP प्रकल्पही राबविले जातात. सदरच्या TSP आणि SC-SP या प्रकल्पांअंतर्गत प्रयोग साहित्याची खरेदी, नोंदी व शेतकऱ्यांशी संपर्क इ. बाबींचा समावेश असतो.

प्रकल्पांअंतर्गत सर्व कामे पुर्ण करण्यासाठी दोन निव्वळ तातपुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने रू. १८,०००/— प्रति महा एकत्रित वेतनावर **कृषि सहाय्यक** नेमणे आहेत. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज **दि. १५/०२/२०२३** पर्यंत या कार्यालयास पोहचतील असे बंद लखोटयातुन पाठवावेत. लखोटयावर **कंत्राटी कृषि सहाय्यक पदासाठी अर्ज— अ. भा. स. सिंचन जलव्यवस्थापन योजना,** असे लिहुन **मा. प्रमुख शास्त्रज्ञ, अ. भा. स. सिंचन जलव्यवस्थापन योजना, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, पिन कोड नं. ४१५ ७११, ता. दापोली, जि. रत्नागिरी** या पत्यावर पाठवावेत.

**कंत्राटी कृषि सहाय्यक पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता:—**

- कृषि उद्यानविद्या/वनशास्त्र/पशुविज्ञान शास्त्र/अन्न शास्त्र/कृषि तंत्रज्ञान/कृषि अभियांत्रिकी/गृहविज्ञान/मत्स्य विज्ञान/कृषि जैवतंत्रज्ञान/कृषि व्यवसाय व्यवस्थापन किंवा कृषि विद्यापिठाकडुन मान्यता प्राप्त असलेल्या संस्थांमधुन दोन वर्षाचा कृषि पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.
- प्राधान्याने विचार केला जाईल अशी शैक्षणिक अर्हता— MS-CIT संगणक प्रमाणपत्र उत्तीर्ण व Ms-excel आणि Ms Power Point मधील कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.

**तातपुरत्या नेमणुकीसाठी अटी व शर्ती**

अटी व शर्ती—

१. वयोमर्यादा— खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता ३८ वर्षे व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरिता ४३ वर्षे राहील.
२. उमेदवारांनी विहीत प्रपत्रामध्ये पूर्ण तपशील भरून अर्ज सादर करावा. अर्ज मा. **प्रमुख शास्त्रज्ञ, अखिल भारतीय समन्वित सिचंन जलव्यवस्थापन योजना, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, पिन कोड ४१५ ७११, ता. दापोली, जि. रत्नागिरी** यांचे नावे सादर करावा.
३. लखोटयावर **कंत्राटी कृषि सहाय्यक** या पदासाठी अर्ज **अखिल भारतीय समन्वित सिचंन जलव्यवस्थापन योजना, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली** या योजनेअंतर्गत असे लिहिलेले असावे.
४. पात्र उमेदवारांची निवड समितीव्दारे मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीची तारीख अर्जाची छाननी झाल्यावर भ्रमणध्वनी/इमेलव्दारे कळविण्यात येईल.
५. मुलाखतीच्यावेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
६. मुलाखतीसाठी उपस्थित असेलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवासभत्ता देय केला जाणार नाही.

७. निवडलेल्या उमेदवाराने रू. १०० किमतीच्या स्टॅम्प पेपरवर नियुक्ती कालावधी दरम्यान तो नोकरी सोडणार नाही आणि नेमुन दिलेले काम पूर्ण करेल आणि तो नियमित नियुक्तीसाठी दावा करणार नाही असे हमीपत्र देणे आवश्यक राहील.

८. उमेदावाराला प्रकल्पातील नेमणुक पुढे चालु ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नियमीत आस्थापनेवर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

९. उमेदावाराला नोकरी सोडुन जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ सूचना द्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.

१०. उमेदवाराचा अर्ज नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाकडे आहे.

११. निवडलेल्या उमेदवारांना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जेथे योजना कार्यरत आहे तेथे नियुक्ती देण्यात येईल.

१२. कार्यालयाच्या कामाकाजाची वेळ ०८.०० ते १७.३० अशी राहील तथापि, एखाद्या दिवसाचे काम वाढल्यास काम पूर्ण होईपर्यंत थांबावे लागेल किंवा काम पूर्ण करण्यासाठी लवकर यावे लागेल.

१३. सुटट्रीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.

१४. जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देता येणार नाही.

१५. काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचे अधिकार संबंधितांना राहतील.

१६. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी– ५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायमस्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

१७. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास उमेदवाराची नेमणुक रद्द होऊ शकते.

१८. कोणत्याही टपाल विलंबनास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१९. कोणत्याही स्वरूपात राजकारणात सहभाग आढळून आल्यास उमेदवाराला या पदासाठी अपात्र ठरविले जाईल.

२०. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना – अ मध्ये अर्जासोबत सादर करावे.

२६. वयाचा लाभ/फायदा उमेदवाराकडुन नॉनक्रिमीलेअर/जातीचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

२१. नावामध्ये बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.

२२. जन्मतारखेचा पुरावा जोडावा.

**२३. प्रमाणपत्रे सत्यप्रतीत/स्वयंसाक्षांकीत असल्यास स्वयंघोषणापत्रासह जोडणे आवश्यक आहे..**

२४. अर्जावर उमेदावाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा.

ठिकाण : वाकवली

दिनांक: २७/०१/२०२३

प्रमुख शास्त्रज्ञ

अ. भा. स. सिंचन जलव्यवस्थापन योजना,

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवण्यात यावा

# अर्जाचा नमुना

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पदाचे नाव | : | |
| २. | प्रकल्पाचे नाव | : | |
| ३. | अर्जदाराचे नाव | : | |
| ४. | पत्ता अ) सद्याचा पत्ता<br>ब) कायमचा पत्ता | : | |
| ५. | जन्म तारीख | : | |
| ६. | दिनांक: १५/०२/२०२३ रोजी वय | : | ............ वर्ष, ............., महिने,..........., दिवस |
| ७. | धर्म/जात | : | |
| ८. | दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | : | |
| ९. | ई–मेल आयडी | : | |
| १०. | शैक्षणिक अर्हता | : | |

| परीक्षा | बोर्ड/महाविद्यालयाचे/शाळेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|
| | | | |

११. अनुभव

| पदाचे नाव | कालावधी | | कामाचे स्वरूप | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२. संगणकीय कामांचा अनुभव

| तपशिल | **Ms-excel** | | **Ms Power Point** | |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | पासुन | पर्यंत |
| कामाचा कालावधी | | | | |
| | | | | |

१३. इतर.

मी असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आहे.सदर माहिती खोटी आढळून आल्यास उपरोक्त पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणिव आहे.

दिनांक :

ठिकाण :

स्वाक्षरी

टिप: अर्जासोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रत केलेल्या असाव्यात.

जर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित केल्या असतील तर शासन निर्णय क्र.प्रसुधा/१६१४/३४५/प्र.क्र.७१/१८–अ, दिनांक ०९/०३/२०१५ अन्वयेविहित नमुन्यातील स्वयंसाक्षांकनाचे स्वयंघोषणापत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार**
**अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना**

**प्रतिज्ञापन**

**नमुना — अ**

**(नियम ४ पहा)**

मी. श्री./श्रीमती/कुमारी.............................................................................................................................

श्री.......................................................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी,

वय.......................... वर्ष, राहणार...........................................................................................................

................................ याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी ............................................................................ ..........................................या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ...................................................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक: २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ...............................................................................आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेली मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक: २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्य ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

(उमेदवाराची स्वाक्षरी)

ठिकाण :
दिनांक: